**ठळक बातम्या**

- भारताची अर्थव्यवस्था आगेकूच करण्याच्या महत्वाच्या टप्प्यावर पोचल्याचा आशावाद रिझर्व्ह बँकेच्या मासिक पत्रिकेत व्यक्त

- घाटकोपर दुर्घटना प्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना

- गाझा पट्टीतल्या वैद्यकीय पुरवठ्यावरची नाकेबंदी उठवण्याची जागतिक आरोग्य संघटनेची इस्त्रायलला सूचना

- देशाच्या़ उत्तर भागात उष्णतेची लाट तीव्र होणार तर दक्षिण भागात नैऋत्य मोसमी पावसासाठी अनुकूल स्थिती तयार झाल्याचा हवामान विभागाचा अंदाज

**आणि**

- बँकॉक इथं सुरू असलेल्या आशियाई रिले अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय खेळाडूंची रौप्य पदकांची कमाई

**<><><><><><>**

भारताची अर्थव्यवस्था आता आगेकूच करण्याच्या महत्वाच्या टप्प्यावर पोहचली असल्याचा आशावाद रिझर्व्ह बँकेच्या मे महिन्याच्या मासिक पत्रिकेतील एका लेखात व्यक्त करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर मायकल देवव्रत पात्रा यांच्या नेतृत्वा खालील चमूने लिहीलेल्या या लेखात बाजारात उत्पादनाची मागणी वाढू लागल्याची ठसठशीत चिन्हे दिसू लागल्याचं तसंच गेल्या २ वर्षात पहिल्यांदाच ग्रामीण

भागात मागणी वाढू लागल्याचं म्हटलं आहे . २०२३-२४ या आर्थिक वर्षात तिमाही महसुलात ऊच्चांकी वाढ झाली असून मार्च २०२४ पासून त्यात आणखी वाढ होत आहे असही या लेखात नमूद करण्यात आल आहे .

**<><><><><><>**

उत्तर प्रदेशमध्ये लोकसभा निवडणुकीच्या ६ व्या आणि ७ व्या टप्प्यातला प्रचार शिगेला पोहचला असून विविध पक्षांचे स्टार प्रचारक जोरदार प्रचार करत आहेत.

प्रधानमंत्री आणि भाजपाचे जेष्ठ नेते नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशातल्या बस्ती आणि श्रावस्ती लोकसभा मतदार संघात प्रचार सभा घेणार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ जौनपूर, सुलतानपूरसह इतर ठिकाणी तर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव महाराजगंजसह इतर ठिकाणी प्रचार सभा घेणार आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आज पश्चिम बंगालमध्ये उत्तर २४ परगणा जिल्हा तसंच उत्तर आणि दक्षिण कोलकात्यात प्रचारसभा घेणार आहेत.

बहुजन समाज पार्टीच्या अध्यक्ष मायावती सुलतानपूर इथं तर समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव आझमगड इथं प्रचार सभा घेणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी आज हरियाणामधल्या चरखीदादरी आणि सोनिपत इथं तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यमुनानगर जिल्ह्यात प्रचार सभा घेणार आहेत.

**<><><><><><>**

मुंबईतल्या घाटकोपर इथं  होर्डिंग कोसळून झालेल्या अपघाताच्या तपासासाठी गुन्हे अन्वेषण विभागाने सहा अधिकाऱ्यांचं विशेष तपास पथक

स्थापन केलं आहे. या अधिकाऱ्यांनी होर्डिंग कंपनीचा मालक भावेश भिंडे याच्या घराची झडती घेतली. गेल्या आठवड्यात विनापरवाना होर्डिंग कोसळून झालेल्या अपघातात सतरा जणांचा मृत्यू झाला होता तर ७५ जण जखमी झाले होते. अपघातानंतर फरार झालेल्या भावेश भिंडेला पोलिसांनी उदयपूरहून ताब्यात घेऊन मुंबईला आणलं आहे .

**<><><><><>**

आम आदमी पक्ष आणि दिल्लीतल्या जनतेविरुद्ध भाजपा कट रचत आहे, अशी टीका आपच्या ज्येष्ठ नेत्या आतिशी यांनी आज नवी दिल्ली इथं बातमीदारांशी बोलताना केली. भाजपानं राजधानी दिल्लीत जलसंकट निर्माण करण्याच्या उद्देशानं दिल्लीचा पाणीपुरवठा रोखला आहे. हरियाणा सरकार यमुनेचं दिल्लीला मिळणारं पाणी रोखून धरत आहे आणि यमुनेच्या पाण्यानं यावर्षी नीचांकी पातळी गाठली आहे, असं तपासात समोर आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवण्याचा भाजपाचा दावा पूर्णपणे काल्पनिक आहे आणि भाजपाला २०१९ च्या निवडणुकींसारखे निकाल यावेळी मिळणं निव्वळ अशक्य आहे , असं मत काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी आज नवी दिल्ली इथं बातमीदारांशी बोलताना व्यक्त केलं. भाजपाच्या बालेकिल्ला असणाऱ्या मतदारसंघात मतदानाची टक्केवारी घसरली असल्याचंही त्यांनी सांगितलं. इंडिया आघाडी आणि काँग्रेसच्या उमेदवारांना जनतेनं उत्साहानं स्वीकारलं आहे ,असं ते म्हणाले.

**<><><><><>**

पोर्शे कार अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन मुलांना दारू पुरवल्याप्रकरणी पुणे शहरातल्या दोन हॉटेलांचे, परमिट रूमचे तसंच पबचे आस्थापनाविषयक व्यवहार जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरुन राज्य उत्पादन शुल्क विभागानं बंद केले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीनं पुणे शहरातल्या सर्व पब्ससह इतर परमिट रूमची विशेष तपासणी मोहीम सुरू आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल, पब आणि आस्थापनेला मद्य विक्रीबाबत देण्यात आलेले परवाने निलंबित अथवा रद्द करण्यात येतील, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागीय उपआयुक्तांनी दिली आहे.

दरम्यान या प्रकरणातल्या आरोपीला आज बालहक्क न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. त्याच्यावर दारू पिऊन कार चालवल्या बद्दल कलम १८५ अंतर्गत नव्यानं गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

देशाच्या सागरी सीमांशी संबधित हितरक्षणासाठी भारतीय नौदल नेहमी सुसज्ज असणं आवश्यक आहे असं प्रतिपादन नौदल प्रमुख दिनेश त्रिपाठी यांनी केलं. ते नवी दिल्ली इथं नौदल मुख्यालयात नौदल अधिकाऱ्यांना संबोधित करत होते. भारतीय नौदलाने आत्मनिर्भर होण्यावर भर दिल्याचं ते म्हणाले. सध्याच्या तसंच भविष्यातल्या आव्हानांवर मात करण्यासाठी नौदलाने अत्याधुनिक आणि स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर केला आहे असं त्यांनी सांगितलं. नौदल कर्मचारी सेवेत समर्पणवृत्ती आणि व्यावहारिकता यांचा मेळ साधत असल्याची त्यांनी प्रशंसा केली.

**<><><><><>**

गाझा युद्ध क्षेत्रात सुमारे ७०० गंभीर आजारी रुग्ण अडकले आहेत म्हणून इस्त्रायलनं या क्षेत्रातल्या वैद्यकीय पुरवठ्यावरची नाकेबंदी उठवावी, अशी  सूचना जागतिक आरोग्य संघटनेच्या अध्यक्षांनी इस्त्रायलला केली आहे.  जिनिव्हा इथं झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती  दिली. इजिप्तपासून गाझा पट्टीपर्यंतची सीमा वाहतुकीसाठी दोन आठवड्यांपासून बंद आहे. यामुळे  युद्धभूमीवर आपत्कालीन वैद्यकीय मदत पुरवठ्यात अडचणी येत आहेत. उत्तर गाझा भागात फक्त दोनच रुग्णालयं कार्यरत असून संयुक्त राष्ट्र संघाच्या आरोग्य विभागाला वैद्यकीय मदतीशिवाय इतक्या लोकसंख्येला आरोग्य सेवा पुरवणं अशक्य आहे, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज इराणला जात आहेत. इराणचे राष्ट्राध्यक्ष सय्यद इब्राहीम रईसी आणि परराष्ट्र मंत्री हुसैन अमीर अब्दुल्लाहियान यांच्या निधनाच्या शोकसभेत ते सहभागी होतील.
इराणचे राष्ट्राध्यक्ष रईसी आणि परराष्ट्र मंत्री अब्दुल्लाहियान यांचं रवीवारी हेलिकॉप्टर अपघातात निधन झालं होतं.  दरम्यान, या अपघाताचा तपास करण्याची इराणची विनंती वाहतुकीच्या गैरसोईचं कारण देत अमेरिकेने फेटाळली आहे.

<><><><><><>

उत्तरेकडचा सपाट प्रदेश आणि मध्य भारतात उष्णतेच्या लाटेचा तीव्र प्रभाव कायम राहण्याचा अंदाज लक्षात घेता हवामान विभागाने या भागाला रेड अलर्ट दिला आहे. पंजाब, हरयाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश,

राजस्थान, मध्य प्रदेश आणि केरळमध्ये पुढचे दोन ते तीन दिवस उष्णतेची लाट कायम राहणार असल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे.

अरबी समुद्राचा आग्नेयेकडचा भाग, मालदीवचा काही भाग आणि अंदमान आणि निकोबार बेटांवर नैऋत्य मोसमी पावसासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं हवामान विभागानं सांगितलं आहे. त्यामुळे येत्या शुक्रवारपर्यंत तमिळनाडू, केरळ, पुद्दुचेरी आणि कर्नाटक राज्यात जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

<><><><><>

बँकॉक इथं सुरू असलेल्या या वर्षीच्या आशियाई रिले अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिलांच्या चार बाय चारशे मीटर रिले संघांनी काल दोन रौप्यपदकं पटकावली. भारताच्या पुरुष धावपटूंच्या रिले संघानं स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवला. यामध्ये श्रीलंकेला सुवर्ण तर व्हिएतनामच्या संघाला कास्यपदक मिळालं. महिला गटात ही भारतीय संघ दुसरा आला.

महिला गटात व्हिएतनाम आणि जपाननं अनुक्रमे पहिला आणि तिसरा क्रमांक मिळवला. या महिन्याच्या सुरुवातीला बहामा मध्ये झालेल्या जागतिक रिले स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला रिले संघ पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी यापूर्वीच पात्र ठरला होता.

<><><><><>

पुणे जिल्ह्यातल्या इंदापूर तालुक्यात उजनी धरणात प्रवाशांना घेऊन जाणारी एक बोट काल बुडाली.  वादळी वाऱ्यामुळे ही दुर्घटना घडली असल्याचा अंदाज आहे.  या बोटीतून चार पुरुष, दोन महिला आणि दोन लहान मुली प्रवास करत होत्या. यातला एक प्रवासी पोहत आल्याने

बचावला मात्र इतर सात प्रवासी अद्याप बेपत्ता आहेत. राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचं शोधकार्य सुरु आहे.

**<><><><><><>**

उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत शिक्षकांसाठी केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२४ साठी अर्ज मागवले आहेत. अर्ज करण्यासाठीच्या एका संकेतस्थळाचं उद्घाटन उच्च शिक्षण सचिव संजय मूर्ती यांनी  केलं.

***//<><><><><><>//***